'एम्स'कडून शस्त्रक्रियेबाबतचे नवे तंत्रज्ञान

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, दिल्ली (एम्स) यांनी शस्त्रक्रियेबाबत एक नवे तंत्रज्ञान विकसित केले आहे. या तंत्रज्ञानामुळे मणक्याच्या आजाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांना उपचाराची आशा निर्माण झाली आहे. यापूर्वी मणक्याशी संबंधित शस्त्रक्रिया अधिक जोखमीच्या मानल्या जात होत्या.

रुग्णालयातील अस्थिरोग विभागात कार्यरत असणाऱ्या डॉ. भावुक गर्ग आणि त्यांच्या चमूने गेल्या सात वर्षांच्या प्रयत्नातून विकसित केलेल्या या शस्त्रक्रिया पद्धतीमुळे मणक्याच्या आजाराने त्रस्त रुग्णांना दिलासा मिळाल्याचे एम्सने जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे. यापूर्वी अशा रुग्णांकडे उपचाराचे मर्यादित पर्याय होते. शस्त्रक्रियेदरम्यान गुंतागुंतीचा धोका असायचा.

हे तंत्रज्ञान 'पोस्टिरियर व्हर्टेब्रल कॉलम रिसेक्शन' या पद्धतीचेच एक रुप आहे. याला जागतिक स्तरावर मणका विकारातून मुक्त करण्यासाठी सर्वात जटिल प्रक्रियांपैकी एक मानले जाते. एम्सच्या या विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचे वर्णन २०२० मध्ये एका आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक जर्नलमध्ये प्रकाशित झाले होते.

चिकित्सकांच्या मते, या सुधारित पद्धतीत शस्त्रक्रियेनंतरच्या टप्प्यांपर्यंत हाडाचा काही भाग संरक्षित ठेवला जातो. त्यामुळे उपचारादरम्यान मणक्याची स्थिरता सुधारते तसेच इतर गुंतागुंती कमी होण्याची शक्यता असते.

मिसिंग लिंक खर्चात सात टक्क्यांची वाढ

प्रकल्प खर्च ६,६९५ कोटींवरून ७,१८० कोटींवर

मंगल हनवते, लोकसत्ता

मुंबई : मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरील खोपोली - कुसगाव दरम्यानची नवीन मार्गिका अर्थात मिसिंग लिंक वाहतूक सेवेत दाखल झाली आहे. प्रकल्प पूर्णत्वास चार वर्ष विलंब झाल्याने प्रकल्प खर्चात ७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. प्रकल्प खर्च ६,६९५ कोटींवरून ७,१८० कोटी रुपयांवर गेला आहे.

महामार्ग वाढत्या वाहनसंख्येला सामावून घेण्यासाठी अपुरा पडू लागल्याने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) महामार्गाच्या रुंदीकरणासह (१० पदरीकरण) मिसिंग लिंक बांधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार खोपोली - कुसगाव दरम्यान १३.३० किमी लांबीच्या नवीन मार्गिकेचे अर्थात मिसिंग लिंकचे काम हाती घेण्यात आले. या प्रकल्पाच्या ६,६९५.३६ कोटी रुपये खर्चाला २९ ऑगस्ट २०१८ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तर प्रकल्पाचा खर्च वसूल करण्यासाठी मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरील पथकर वसुलीचा कालावधी १५ वर्षांनी वाढविण्यात आला. त्यामुळे पथकर वसुलीचा कालावधी २०३० वरून थेट २०४५ वर गेला.

दरम्यान, मिसिंग लिंकच्या कामाला २०१९ मध्ये सुरुवात झाली. कामाला सुरुवात झाल्यानंतर २०२१-२२ मध्ये हा प्रकल्प पूर्ण होऊन वाहतूक सेवेत दाखल होणे अपेक्षित होते. मात्र करोना संकट आणि इतर कारणांमुळे प्रकल्प पूर्णत्वास विलंब होऊन प्रकल्प मे २०२६ सेवेत दाखल झाला. प्रकल्पात ४८५ कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. प्रकल्पातील पूल क्रमांक २ हा अत्याधुनिक केबल-स्टेड पूल असून त्यासाठीचे परीक्षण, तांत्रिक चाचण्या विदेशातील तज्ज्ञ संस्थांमार्फत करण्यात आल्या आहेत.

खर्चाला मान्यतेची गरज नाही!

खंडाळा परिसरातील सोसाट्याच्या वाऱ्यात, मुसळधार पावसात, धुक्यामध्ये काम करणे आव्हानात्मक होते. या सर्व बाबींमुळे प्रकल्पास विलंब झाल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, प्रकल्पाच्या खर्चात १० टक्क्यांनी वाढ झाल्यास त्यास राज्य सरकारची मान्यता घ्यावी लागते. मात्र येथे ७ टक्के वाढ झाल्याने अशी मान्यता घ्यावी लागणार नसल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

खारेगाव टोलनाक्याला मनसे, शरद पवार गटाचा विरोध

लोकसत्ता प्रतिनिधी

ठाणे : मुंबई नाशिक महामार्गावरील वडपे-माजिवडा प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर मुंबई नाशिक महामार्गावर खारेगाव टोलनाका उभारण्यात येणार आहे. या टोलनाक्यास मनसे आणि राष्ट्रवादीने (शरद पवार गट) विरोध दर्शविला आहे. त्यामुळे खारेगाव टोलनाका निर्माण होण्यापूर्वीच वाद उफाळण्याची शक्यता आहे.

काही महिन्यात मार्गिकेच्या निर्माणाचे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या मार्गिकेवरील खारेगाव भागात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून टोलनाका उभारला जाणार आहे. त्यामुळे वाहन चालकांना टोल वसुलीचा भुर्दंड सहन करावा लागेल. या संदर्भाचे वृत्त २ मे रोजी दैनिक 'लोकसत्ता'मध्ये प्रसिद्ध झाले होते. या वृत्तानंतर आता मनसे आणि राष्ट्रवादीने (शरद पवार गट) आंदोलनाचा इशारा दिला आहे.

यामुळे प्रवास खर्च वाढल्याने व्यापाऱ्यांकडून जीवनावश्यक वस्तूंचेही दर वाढविले जाणार आहेत. त्यामुळेच आमचा या टोल नाक्याला विरोध आहे. मात्र, हे सरकार पाशवी बहुमताचा आधार घेऊन टोलनाक्याचा विरोध चिरडून टाकणार आहे, यात शंका नाही. त्यामुळे १४ ऑक्टोबर २०२४ मध्ये ज्याप्रमाणे मुंबईत प्रवेश करणाऱ्या पाचही टोल नाक्यांवर टोलमुक्ती देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर हा टोल नाक्यावर ठाणेकरांसाठी टोलमुक्ती द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

राष्ट्रीय उद्यानात पर्यटन सेवांच्या शुल्क वाढीस तात्पुरती स्थगिती

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रशासनाकडून विशेष पर्यटन सेवांचे शुल्क वाढविण्यात आले होते. त्यासाठी संबंधित विभागाकडून मान्यताही मिळाली होती. उद्यानातील विविध पर्यटन सेवांच्या शुल्कासह उद्यानात प्रभात फेरीसाठी आकारण्यात येणाऱ्या वार्षिक शुल्कातही वाढ करण्यात आली होती. नवे दर १ मे पासून लागू होणार होते. मात्र, नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्यानंतर उद्यान प्रशासनाकडून पर्यटन शुल्क वाढीस तात्पुरती स्थगिती दिली आहे.

हे राष्ट्रीय उद्यान मुंबईकरांसह अनेक पर्यटकांचे आवडते उद्यान असून तेथे मोठ्या संख्येने नागरिक भेट देत असतात. उद्यान प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, उद्यान व्यवस्थापनाची तांत्रिक सक्षमता वाढविण्यासाठी, उद्यानातील पायाभूत सुविधा तसेच उद्यान देखभालीच्या अनुषंगाने नवे दर निश्चित करण्यात आले होते. त्यात प्रवेश शुल्क, उद्यानातील विविध सफारींचे शुल्क, प्रभात फेरीसाठीचे वार्षिक शुल्क, वाहनतळ शुल्क तसेच इतर पर्यटन सेवा आणि मिनी ट्रेनच्या तिकीटासाठीही नवे दर १ मे पासून लागू होणार होते.

सुधारित दर लवकरच

उद्यान प्रशासनाकडून प्रशासकीय आणि तांत्रिक कारणांमुळे शुल्क दरवाढीस स्थगिती देण्यात येत आहे. पर्यटन सेवांचे सुधारित दर लवकरच निश्चित केले जातील, असे प्रशासनाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाकडून पर्यटन शुल्क वाढीस तात्पुरती स्थगिती दिली आहे.

भरधाव मोटारीची पादचाऱ्यांना धडक

मुंबई : पवईच्या महात्मा फुले नगर परिसरात रविवारी सायंकाळी ६ च्या सुमारास एका भरधाव मोटारीने काही पादचाऱ्यांना जोराची र धडक दिली. यामध्ये तीनजण जखमी झाले असून त्यांच्यावर विक्रोळीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. पोलिसांनी चालक विशाल संधू याला ताब्यात घेतले आहे.

माजी विद्यार्थ्याकडून शिक्षिकेची ५१ लाखांची फसवणूक

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : घर घेण्यासाठी शिक्षिकेने दिलेली ५१ लाखांची रक्कम घेऊन माजी विद्यार्थी फरार झाल्याची घटना घाटकोपर परिसरात घडली. याबाबत शिक्षिकेने केलेल्या तक्रारीवरून टिळकनगर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करत माजी विद्यार्थ्यांचा शोध सुरू केला आहे.

घाटकोपर येथे काही दिवसांपूर्वी त्यांनी घर घेण्याचे ठरवले. तेथे त्यांना बद्रा नावाचा त्यांचा विद्यार्थी भेटला. त्याच्यावर विश्वास ठेवत त्याला टप्प्याटप्प्याने ५१ लाख रुपये दिले. ज्या दिवशी घराची नोंदणी करायची होती तेव्हा तो न आल्याने शिक्षिकेला शंका आली. त्यांनी चौकशी केली असता तो दलाल असल्याचे समजले. त्यामुळे त्यांनी पोलिसात तक्रार दिली.

वाजपेयी यांच्या पुतळ्याला जागाच नाही

मुंबई : मुंबई महापालिकेच्या सभागृहात माजी पंतप्रधान आणि भाजपचे दिवंगत ज्येष्ठ नेते अटलबिहारी वाजपेयी यांचा पुतळा बसवण्यास आता जागाच नसल्याचे कारण देत पालिका प्रशासनाने ही मागणी फेटाळली आहे.

पालिकेच्या सभागृहातील नगरसेवकांची संख्या वाढली असून नगरसेवकांना बसण्यास जागा पुरत नाही तसेच आधीच सभागृहात असलेले पुतळे व अर्धपुतळे यामुळे जागा व्यापलेली असताना नवीन पुतळ्यासाठी जागा नाही, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आलेली असताना या मागणीचे आता पुढे काय होणार याबाबत उत्सुकता आहे.

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा पुतळा पालिकेच्या ऐतिहासिक सभागृहात बसवण्यात यावा, अशी मागणी माजी नगरसेविका दक्षा पटेल यांनी २०१८ मध्ये केली होती. या मागणीवर पालिका प्रशासनाने असमर्थता दर्शवली आहे. वाजपेयी यांचा पुतळा अन्य समित्यांच्या सभागृहात लावता येईल, अशीही सूचना प्रशासनाने केली आहे. याबाबतचा निर्णय आता सत्तेवर असलेल्या भाजपच्या लोकप्रतिनिधींना घ्यावा लागणार आहे.

EQUITAS SMALL FINANCE BANK LTD
{Formerly Known As Equitas Finance Ltd}
Registered Office: No.769, Spencer Plaza, 4th Floor, Phase-II, Anna Salai, Chennai, TN - 600 002

मागणी सूचना
सरफेसी ॲक्ट २००२च्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचना

सूचना याद्वारा देण्यात येते की, खालील ऋणकोंनी इक्विटास हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ("ईएचएफएल")/ इक्विटास फायनान्स लिमिटेड ("ईएफएल")/ इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड ("ईएसएफबी") यांच्याकडून कर्जाचा लाभ घेतला आहे. उक्त ऋणको त्यांच्या हप्त्यांचे प्रदान करण्यास असमर्थ ठरले आहेत / होते, त्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा निर्गमित केलेल्या मार्गदर्शकसुत्रांनुसार त्यांच्या खात्यांचे नॉन परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. सुरक्षित स्थावर मालमत्तेचा तपशील, कर्ज व ऋणकोद्वारा देय तारखेनुसार थकित रक्कम याखाली नमूद करण्यात आली आहे. ऋणको तसेच आम जनतेस कळविण्यात येते की, सुरक्षित धनकोचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सरफेसी ॲक्ट, २००२ च्या तरतुदी अंतर्गत खालील ऋणकोंच्या विरोधात कारवाई सुरू केली आहे आणि कोणीही उक्त मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये. या सूचनेच्या ६० (साठ) दिवसांच्या आत खालील नावांच्या अनुसार दर्शविलेल्या थकित देणींची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्यास, निम्नस्वाक्षरीकार सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (४) अंतर्गत कोणत्याही एक किंवा अधिक अधिकारांची, मालमत्तेचा ताबा घेण्याचा आणि सदर मालमत्तेची विक्री करण्याचा अधिकार समाविष्ट, अंमलबजावणी करतील.

अ. क्र.	ऋणको/ हमीदाराचे नाव/ शाखेचे नाव	मागणी सूचनेची तारीख व रक्कम	सुरक्षित मत्तेचे वर्णन (स्थावर मालमत्ता)
१.	शाखा - लातूर २ मडणेनगर लोन नं. : SELTRII0311497 ऋणकोचे नाव : श्री. / श्रीमती माया नंदकुमार शिंदे सह-ऋणको : श्री. / श्रीमती प्रभाकर महादेव शिंदे, श्री. / श्रीमती शिंदे नंदकुमार प्रभाकर श्री. / श्रीमती सवीता प्रभाकरराव शिंदे	२५.०३.२०२६ व रक्कम रु. ५,४२,७३१/-	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता धारण केलेला गॅट नं. ९९ त्यापैकी प्लॉट नं. ३३, मोजमापाचा ९९.८८ चौ.मी. म्हणजेच १०७५ चौ.फू. येथे स्थित - हरंगूल (बुद्रुक), ता. लातूर, जि. लातूर. उत्तरेच्या दिशेने : ६ मी. रुंद रोड , दक्षिणेच्या दिशेने : प्लॉट नं. ३८, पूर्वेच्या दिशेने : प्लॉट नं. २३, पश्चिमेच्या दिशेने : प्लॉट नं. ३४.
२.	शाखा - लातूर २ मडणेनगर लोन नं. : SELTRII0462729 ऋणकोचे नाव : श्री. / श्रीमती पाशामिया इमामोद्दीन मणियार सह-ऋणको : श्री. / श्रीमती सोफिया पाशामिया मणियार	२५.०३.२०२६ व रक्कम रु. ३,०४,९८५/-	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता धारण केलेला गॅट नं. १६४ त्यापैकी प्लॉट नं. ६१, मोजमापाचा ७४.३४ चौ.मी. म्हणजेच ८०० चौ.फू. येथे स्थित - ग्रामपंचायत मालवती, ता. लातूर, जि. लातूर. उत्तरेच्या दिशेने : प्लॉट नं. ६२, दक्षिणेच्या दिशेने : प्लॉट नं. ६२, पूर्वेच्या दिशेने : प्लॉट नं. ८६, पश्चिमेच्या दिशेने : २० फू. रुंद रोड.
३.	शाखा - उदगीर लोन नं. : 600000035956 ऋणकोचे नाव : श्री. पिंजारी अहमद मौला सह-ऋणको : श्री. पिंजारी मौला रसूलसाब	१३.०३.२०२६ व रक्कम रु. ४,०६,२८८/-	"अनुसूची-१ - हमीदार - २ : पिंजारी सहेरा मौला. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता धारण केलेला ग्रामपंचायत सिरियल नं. ३२८, पहिला ग्रामपंचायत मिळकत नं. २९१/४ मोजमापाचा ९६ चौ.मी. म्हणजेच १०३४ चौ.फू., येथे स्थित - ग्रामपंचायत सावरगाव थोट, ता. अहमदपूर, जि. लातूर. मोजमापाची : १०३४ चौ.फू. येथे स्थित - उप-नोंदणी जिल्हा, अहमदपूर व नोंदणी जिल्हा, लातूर. उत्तरेच्या दिशेने : महमूद मुंजेवार, दक्षिणेच्या दिशेने : रोड, पूर्वेच्या दिशेने : गंगाधर कोनाले यांचा प्लॉट, पश्चिमेच्या दिशेने : दस्तगीर रसूल पिंजारी."
४.	शाखा - उस्मानाबाद लोन नं. : 600000026035 ऋणकोचे नाव : श्री. अशोक तुकाराम गायकवाड सह-ऋणको : श्रीमती ज्योती अशोक गायकवाड	१७.०२.२०२६ व रक्कम रु. ५,६९,६०१/-	"आयटम-१ - हमीदार -१ : ज्योती अशोक गायकवाड. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता धारण केलेला ग्रामपंचायत मिळकत नं. ३३८ मोजमापाची १६२.६० चौ.मी. म्हणजेच १७५० चौ.फू. येथे स्थित - खानापूर, ता. उस्मानाबाद. मोजमापाची : १७५० चौ.फू. उप-नोंदणी जिल्हा, उस्मानाबाद व नोंदणी जिल्हा, उस्मानाबादच्या मर्यादेत स्थित. उत्तरेच्या दिशेने : शेषेराव जंगाले यांची मिळकत, दक्षिणेच्या दिशेने : दिलीप गराड यांची मिळकत, पूर्वेच्या दिशेने : रोड, पश्चिमेच्या दिशेने : श्रीधर केस्कर यांची मिळकत. "
५.	शाखा - मोंढा लोन नं. : SEMONDA0438502 / 200002538553 ऋणकोचे नाव : श्री./ श्रीमती प्रदिप बाबूराव गाढे सह-ऋणको : श्री./ श्रीमती शोभाबाई बाबूराव गाढे	२५.०३.२०२६ व रक्कम रु. ७,३४,२७४/-	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता धारण केलेला ग्रामपंचायत मिळकत नं. ११९, मोजमापाची १११.५२ चौ.मी. म्हणजेच १२०० चौ.फू. येथे स्थित - ग्रामपंचायत पंगारगाव, ता. मुडखेड, जि. नांदेड. उत्तरेच्या दिशेने : शामराव गाढे यांचा प्लॉट, दक्षिणेच्या दिशेने : संतोष पाटील यांचा प्लॉट, पूर्वेच्या दिशेने : रोड, पश्चिमेच्या दिशेने : आप्पाजी गाढे यांचा प्लॉट. "

दिनांक : ०४-०५-२०२६
स्थळ : संभाजीनगर
स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.

"सदर नोटिसीमध्ये नमूद केलेल्या सर्व मजकुराबाबतच्या अधिक सुस्पष्टतेसाठी इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध केलेली नोटीस ग्राह्य धरण्यात येईल."

फेर ई-जाहीर निविदा
कार्यालयाचे नाव-चिपळूण नगरपरिषद ता.चिपळूण, जि. रत्नागिरी
फेर ई-निविदा मागविणारी सूचना क्र. ४१५ सन २०२६-२७

चिपळूण नगरपरिषदेकडील फेर ई-निविदा सूचना क्रमांक ४१५ सन २०२५-२६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे या योजने अंतर्गत चिपळूण नगरपरिषद हद्दीतील विविध विकास कामासाठी योग्य त्या कंत्राटदारांकडून ई-निविदा प्रणालीद्वारे फेर ई-निविदा (दुसरी मागणी) मागविण्यात येत आहेत. सदर निविदा बाबतचा सविस्तर तपशील अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाचे https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०५.०५.२०२६ रोजी पासून पहावयास उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. निविदा सादर करणेची अंतिम तारीख दिनांक १२.०५.२०२६ रोजी पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.

दिनांक : १.५.२०२६
सही/-
मुख्याधिकारी
चिपळूण नगरपरिषद

फॉर्म क्र. RSC – 4
[नियम 3(3) अन्वये]
राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ समोर
CP क्र. 261(MB)/2025
Upmove Financial Technologies Services Private Limited
...याचिकाकर्ता कंपनी
सार्वजनिक सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, याचिकाकर्ता कंपनीने कंपनी कायदा, 2013 च्या कलम 66 अंतर्गत आपल्या भागभांडवलातील कपात (Reduction of Share Capital) मंजूर करून घेण्यासाठी माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठासमोर एक याचिका सादर करण्यात आली असून, त्यावर दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

प्रस्तावित भागभांडवल कपातीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

विद्यमान शेअर भांडवल: ₹3,00,00,000 (रुपये तीन कोटी फक्त)
- इक्विटी शेअर भांडवल: ₹1,00,00,000
- प्राधान्य (प्रेफरन्स) शेअर भांडवल: ₹ 2,00,00,000

कपातीनंतरचे शेअर भांडवल: ₹1,00,00,000 (रुपये एक कोटी फक्त)
- इक्विटी शेअर भांडवल: ₹1,00,00,000

कपातीची रक्कम: ₹ 2,00,00,000 (रुपये दोन कोटी फक्त)

ही कपात ₹100/- दर्शनी मूल्य असलेल्या 2,00,000 (दोन लाख) 0% वैकल्पिक रूपांतरणीय प्राधान्य समभागांचे (Optionally redeemable Convertible Preference Shares) रद्द करून व संपुष्टात आणून करण्यात येत आहे.

कंपनीचे कोणतेही सुरक्षित किंवा असुरक्षित धनको (Creditors) नाहीत; त्यामुळे, त्यांना नोटिसा बजावण्याची किंवा धनकोंची यादी ठेवण्याची कोणतीही आवश्यकता नाही.

ज्या कोणत्याही व्यक्तीचे हित या प्रस्तावित भागभांडवल कपातीमुळे प्रभावित होऊ शकते, त्यांनी आपले आक्षेप (असल्यास) या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून तीन (3) महिन्यांच्या आत माननीय न्यायाधिकरणाकडे सादर करावेत व त्याची प्रत याचिकाकर्ता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा vishalpokharna@gmail.com या ईमेलवर पाठवावी.

निर्धारित कालावधीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास, प्रस्तावित कपातीस कोणताही आक्षेप नसल्याचे गृहीत धरले जाईल.

तसेच, सदर याचिकेची सुनावणी दिनांक 25 ऑगस्ट 2026 रोजी माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ समोर निश्चित करण्यात आली आहे.

दिनांक: २९/०४/२०२६
ठिकाण: मुंबई
सही
विशाल पोखरणा
संचालक
DIN: 02892051

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, पुणे : १२५९, डेक्कन जिमखाना, रेणुका कॉम्प्लेक्स, १ ला मजला, जंगली महाराज रोड, पुणे-४११००४,
फोन : ६३६४९०५१५३ / ७५०९९८५७०५
Email : cb5208@canarabank.com

मेसर्स ट्रिलियन रियल इस्टेट्स ॲण्ड प्रॉपर्टीज (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांची अनुत्पादक कर्जसुविधा पात्र खरेदीदार (एआरसीएस/एनबीएफसीज/बँका /वित्तीय संस्था) यांच्याकडे ई-ऑक्शन द्वारे हस्तांतरित करण्याच्या संदर्भात जाहिरात.

कॅनरा बँक पात्र एआरसीएस / एनबीएफसीज/बँका/ अखिल भारतीय वित्तीय संस्था (पात्र बोलीदार) यांच्याकडून, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या सविस्तर मार्गदर्शक सूचनांनुसार, **मेसर्स ट्रिलियन रियल इस्टेट ॲण्ड प्रॉपर्टीज (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड,** ज्यांचे खाते कॅनरा बँकेत असून ज्यांच्याकडून फंड बेस्ड लिमिट रुपये **१५६.१९ कोटी (रुपये एकशे छपन्न कोटी एकोणीस लाख फक्त)** ही दिनांक **३१.०३.२०२६** रोजी अधिक पुढील व्याज आणि अन्य आकार इत्यादी ही ई-ऑक्शन द्वारे हस्तांतरित करण्यासाठी (ईओआय) एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट आमंत्रित करीत आहेत. ही मालमत्ता ई-ऑक्शनद्वारे **''जशी आहे, जेथे आहे'', ''जशी आहे, जे आहे'', ''तेथे जे काही आहे'', आणि ''फेरविचार नाही''** या तत्वावर देणे आहे. कॅनरा बँक या संदर्भात कोणत्याही प्रकारची ऑपरेशनल, लीगल किंवा अन्य कोणत्याही प्रकारची जोखीम सदर कर्ज सुविधा प्रकरणात स्वीकारणार नाही आणि मेसर्स ट्रिलियन रियल इस्टेट ॲण्ड प्रॉपर्टीज (इंडिया) यांच्या वतीने कोणतेही प्रतिनिधित्व किंवा वॉरंटी पुरविणार नाही. सर्व इच्छुक पात्र बोलीदार यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर ई- ऑक्शन मध्ये सहभागी होण्याबाबत त्यांची इच्छा प्रकट करण्यासाठी ईओआय मार्फत त्यांची विनंती दाखल करावी, आणि आधी केले नसल्यास नॉन-डिस्क्लोजर ॲग्रीमेंट दाखल करावे. ईओआय दाखल करण्याची अखेरची तारीख **०७.०५.२०२६** आहे. इच्छुक बोलीदार यांना कॅनरा बँकेची वेबसाईट वेब नोटीस बघण्यासाठी संपर्क करता येईल आणि **www.canarabank.com** वर टेंडर्स वर क्लिक करून आणखी तपशील मिळवता येईल. इच्छुक पार्टीना खाली सही करणार यांच्याशी संपर्क साधता येईल.

संपर्क	संपर्क तपशील	ईमेल आयडी
श्री. श्रीराम व्ही.	६३६४९०५१५३	cb5208@canarabank.com
श्री. प्रदीप श्रीवास्तव	७५०९९८५७०५	

कृपया याची नोंद घ्यावी की, या जाहिरातीत नमूद करण्यात आलेली ई-ऑक्शन प्रक्रिया ही सक्षम प्राधिकरण यांच्याकडून अंतिम मान्यता मिळण्याच्या अधीन राहील. याशिवाय, कॅनरा बँकेने या जाहिरातीतील कोणतेही कलम कोणत्याही वेळी रद्द करणे, सुधारित करणे, दुरुस्त करणे किंवा काढून घेणे हा अधिकार तसेच कागदपत्रांवर प्रक्रिया करणे आणि/किंवा कोणत्याही पात्र प्रस्तावकास कोणत्याही वेळी कोणतेही कारण न देता अपात्र ठरविणे आणि कोणतीही जोखीम न स्वीकारता ही बाब वेबसाईटवर अपलोड करून स्पष्ट करणे हा अधिकार राखून ठेवला आहे आणि या संदर्भात कॅनरा बँक यांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.

हे प्रस्तावाचे कागदपत्र नाही आणि कोणत्याही स्वरूपाच्या बांधिलकीविना जारी करण्यात आले आहे.

दिनांक : ०२.०५.२०२६
स्थळ : पुणे
कॅनरा बँक,
एआरएम शाखा, पुणे यांच्याकडून जारी

बैंक ऑफ इंडिया Bank of India BOI
मुख्य कार्यालय: निवेशक संबंध विभाग, स्टार हाऊस - I, आठवा मजला, सी-5, जी-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई – 400051 दूरध्वनी: (022) 6668 4490/91
ईमेल: headoffice.share@bankofindia.bank.in

भागधारकांनो लक्ष द्या

1. कंपनी कायदा, 2013 च्या कलम 124(6) नुसार बँक ऑफ इंडियाच्या भागधारकांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, ज्या शेअर्सवर सलग सात वर्षे किंवा त्याहून अधिक काळ लाभांश दावा न करता राहिले आहे, ते शेअर्स केंद्र सरकारने स्थापन केलेल्या आयईपीएफमध्ये हस्तांतरित करण्यास पात्र आहेत.
2. त्यानुसार, आर्थिक वर्ष 2014-15 पर्यंत घोषित केलेले लाभांश सलग सात वर्षे किंवा त्याहून अधिक काळ अदा न केलेले/दावा न करता राहिलेले आणि 07 मार्च 2026 रोजी किंवा त्यापूर्वी कोणतीही वैध दावा प्राप्त न झालेले सर्व शेअर्स बँकेने आयईपीएफ (IEPF) मध्ये हस्तांतरित केले आहेत.
3. हस्तांतरणापूर्वी, बँक/आरटीए/डिपॉझिटरीजकडे उपलब्ध असलेल्या नोंदीनुसार, संबंधित भागधारकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर/ई-मेल आयडीवर दिनांक 08.12.2025 रोजी वैयक्तिक पत्रव्यवहार पाठवण्यात आला होता. बँकेने दिनांक 08.12.2025 रोजी वर्तमानपत्रांमध्ये सूचना प्रसिद्ध करून भागधारकांना 07 मार्च 2026 पर्यंत त्यांचे दावे दाखल करण्याची विनंती केली होती.
4. अशा भागधारकांचा आणि आयईपीएफकडे हस्तांतरित केलेल्या शेअर्सचा तपशील बँकेच्या www.bankofindia.bank.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. भागधारक क्यूआर कोड स्कॅन करून हा तपशील मिळवू शकतात.
5. याव्यतिरिक्त, आम्ही बँक ऑफ इंडियाच्या सर्व भागधारकांना विनंती करतो की, नुकसान, हानी, गैरव्यवस्थापन इत्यादी धोके टाळण्यासाठी त्यांनी लवकरात लवकर त्यांचे डिमॅट (demat) स्वरूपात रूपांतरित करावे. तसेच, आम्ही सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांकडेही आपले लक्ष वेधतो की, भौतिक स्वरूपातील शेअर्स हस्तांतरित किंवा विकले जाऊ शकत नाहीत.
6. पत्रव्यवहार प्राप्त करण्यासाठी आणि लाभांशाचे पेमेंट सुरळीतपणे होण्यासाठी, कृपया पॅन, संपर्क तपशील, पिनसह पोस्टल पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी, बँक खात्याचा तपशील, नमुना सही आणि नामनिर्देशनाचा पर्याय यांसारखे केवायसी तपशील बँकेच्या आरटीए/ संबंधित डीपीमध्ये अपडेट करा.
7. या